**महाराष्ट्र शासन**
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर विभाग, नागपूर
कार्यालय :- धनवटे चेंम्बर्स (अॅनेक्स) सिताबर्डी नागपूर-४४००१२
फोन न ०७१२-२५२४५४९, २५२३३५४ फॅक्स नं. ०७१२-२५३३४५०
ईमेल आयडी - djrngp2011@gmail.com, djr_ngp@rediffmail.com, djrngp@rediffmail.com

जा.क्र.नियमन/भं.अर्बन बँक/कलम८८/चौकशी/ ३४२८ /२०१७ दि.१६/०९/२०१७

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत आदेश

**वाचले** :- १. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.ना.बँका/ १-सआ/ दि भं.अ.बँक/ता.ठवकर/१०८८/१६, दि.१६/०५/२०१६

२. या कार्यालयाचे जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, भंडारा यांना दिलेले पत्र दिनांक ०३/०६/२०१६ व २८/०६/२०१६

३. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, भंडारा यांचा चौकशी अहवाल दि.३/९/२०१६

४. या कार्यालयाचे कायदा कलम ८९(अ) अन्वये तपासणी आदेश जा.क्र.२४१/१६, दि.३१/३/२०१६ व संबंधित शुध्दीपत्रक जाक्र.३९९४/२०१६ दिनांक ७/०९/२०१६

५. श्री. ताराचंद जग्गुजी ठवकर, सदस्य तथा सेवानिवृत्त उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनास सादर केलेला तक्रार अर्ज दिनांक १०/०९/२०१६ या कार्यालयास जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांचेकडून प्राप्त पत्र क्र.१६३९/१७, दिनांक २२/०३/२०१७

६. श्री. एस. टी. गोंदे, तपासणी अधिकारी अंतर्गत कलम ८९(अ) तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचा तपासणी अहवाल सन २०१५-१६ सादर दिनांक ३१/०३/२०१७

७. या कार्यालयाचे दि भंडारा अर्बन सहकारी बँकेस पत्र क्र.१३७९/२०१७, दि.१७/०४/२०१७

८. मुख्य कार्यकारी अधिकारी, भंडारा अर्बन सहकारी बँक मर्या., भंडारा यांचा खुलासा पत्र क्र.१७७४/१७-१८, दि.७/०७/२०१७ व २९/०७/२०१७

९. या कार्यालयाने कलम ८९(अ) अंतर्गत तपासणी अहवालाचे अनुषंगाने मागविण्यात आलेला शकपुर्तता अहवाल पत्र क्र.नियमन/भंडारा अर्बन बँक/क.८९-अ/२६५९/२०१७, दि.१७/०७/२०१७

१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, दि भंडारा अर्बन को-ऑप. बँक लि, भंडारा यांनी पत्र क्र.युबी/बिएचओ /प्रशासन/१६२४/२०१७-१८, दि.२४/०७/२०१७ अन्वये सादर केलेला शकपुर्तता अहवाल

---

ज्याअर्थी, दि भंडारा अर्बन को-ऑप बँक लिमि., भंडारा ही बँक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत करण्यात आलेली असून सदहू कायदा, नियम व उपविधीतील तरतुदीनुसार कामकाज करणे बँकेला अनिवार्य आहे. आणि

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, श्री. ताराचंद जग्गुजी ठवकर, सभासद व निवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच शासनाकडे बँकेच्या अनागोंदी कारभार व पैशाच्या उधळपट्टीची चौकशी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९(अ) अंतर्गत करण्याबाबत दि.०१/०४/२०१६ चे पत्रान्वये विनंती केली होती. सदर्हू तक्रार अर्जात नमूद मुद्यांची चौकशी करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा चौकशी अहवाल सादर करणेबाबत मा.सहकार आयुक्त कार्यालयाने वाचा क्र.१ अन्वये या कार्यालयास सुचित केल्यानुसार वाचले क्र.२ अन्वये जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, भंडारा यांची नियुक्ती करण्यात आली. सदर्हू तक्रारीत नमूद मुद्यांची चौकशी करुन चौकशी अधिकारी यांनी वाचले क्र.३ अन्वये त्यांचा चौकशी अहवाल सादर केला. आणि

ज्याअर्थी, चौकशी अधिकारी यांचा तपासणी अहवाल दि.०३/०९/२०१६ मध्ये तक्रारकर्ते श्री ठवकर यांनी नमूद केलेल्या काही मुद्यांबाबत सुस्पष्टता नसल्यामुळे व श्री ठवकर यांचा तक्रार अर्ज दि.१०.०९.२०१६ मधील जादा मुद्यांची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्यामुळे श्री ठवकर यांच्या विनंतीनुसार सदर्हू मुद्यांवर चौकशी करण्याकरीता कायदा कलम ८९-अ अंतर्गत नियुक्त केलेले तपासणी अधिकारी श्री.एस. टी. गोंदे, विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना दि.१६/०१/२०१७ चे पत्रान्वये कळविण्यात आले. तपासणी अधिकारी यांनी कलम ८९अ अंतर्गतच्या तपासणी अहवालात बँकेला नुकसान झाल्याचे नमूद केले आहे. आणि

ज्याअर्थी, बँकेने यासंदर्भात सादर केलेला खुलासा संयुक्तिक नसून कलम ८९(अ) अंतर्गत तपासणी अहवालातील निष्कर्षानुसार उक्त बँकेच्या पैशाचे किंवा मालमत्तेचे अपयोजन झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. त्यामुळे, उक्त बँकेचे संचालक व पदाधिकारी यांच्या अशा कृती किंवा अकृतीमुळे आणि अपयोजन केल्यामुळे बँकेचे आर्थिक नुकसान झाले असल्याबाबत प्रथमदर्शनी माझी खात्री झालेली आहे. त्यामुळे, सदरचे मुद्यांवर सखोल चौकशी करुन बँकेस झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करणेकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे अनिवार्य झाल्याची माझी खात्री झालेली आहे.

Scanned by CamScanner

त्याअर्थी, पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ नुसार तसेच महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना क्रमांक सीएसएल/२४९३/११६२/ सीआर- ४७/१५- सी दि.०७ ऑगस्ट १९९३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी प्रवीण वानखेडे, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर याव्दारे दि भंडारा अर्बन को-ऑप. बँक लिमि., भंडारा या बँकेत झालेल्या गैरव्यवहाराची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत चौकशी करण्याकरीता श्री. मनोज देशकर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट क्र.अ"** मध्ये नमूद मुद्दे व त्यासंदर्भात **"परिशिष्ट क्र.ब"** मध्ये नमूद यादीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन चौकशी अहवाल ६ महिन्याचे आंत या कार्यालयास सादर करावा. तसेच प्राधिकृत अधिकारी यांनी कलम ८८ (२) अन्वये सदर्हू चौकशीचा खर्च निश्चित करुन तो खर्च कोणाकडून किती वसूल करावा याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करावा. सदर्हू आदेश मी माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक १५/०९/२०१७ रोजी पारीत केला आहे.

(प्रवीण वानखेडे)
**विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था, नागपूर**

**प्रत** :-

१. श्री. मनोज देशकर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर्हू चौकशी विहीत मुदतीत पूर्ण करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, भंडारा अर्बन को-ऑप. बँक मर्या., भंडारा यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी प्राधिकृत अधिकाऱ्यास चौकशी कामी सहकार्य करावे. तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांचे पी. एल. ए. खात्यात चौकशी खर्चाकरीता रक्कम रुपये ५०,०००/- जमा करावे.
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी प्राधिकृत अधिकारी यांना चौकशी खर्चापोटी अग्रीम रक्कम रुपये ५०,०००/- तात्काळ अदा करावे.
४. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर (लेखापरिक्षण) सस्नेह
५. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, भंडारा

**प्रत माहितीकरीता सविनय सादर**
मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था, नागपूर**

Scanned by CamScanner